MHRT040005632025

दाखल तारीख - १०.११.२०२५
फैल तारीख - १०.११.२०२५
निकाल तारीख - १०.०३.२०२६
कालावधी -०० वर्षे ०४ महिने ०० दिवस

<u>जिल्हा न्यायाधीश-१, खेड, यांचे न्यायालयात</u>
<u>ता. खेड, जि. रत्नागिरी</u>
(<u>पीठासन अधिकारी प्र.श.चांदगुडे यांचेसमोर</u> )

<u>किरकोळ दिवाणी अपील क्रमांक २५/२०२५</u>
<u>निशाणी नंबर १९</u>

संतोष तुकाराम दोडेकर
वय -५० वर्षे, व्यवसाय-शेती
रा.मु.पो.तळे, ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८इ
व रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.५)
मो.क्र.९२७१३८३२८५ अपीलार्थी

विरुध्द

१. विजय जयराम दोडेकर
वय सु.५४ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील वादी क्र.१) उत्तरार्थी

२. विष्णू जयराम दोडेकर
वय सु.६७ वर्षे, धंदा -शेती
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील वादी क्र.२)

३. सखाराम बाबू दोडेकर
वय सु.७२ वर्षे, धंदा -निवृत्त
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी

(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.२३ व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१)

४. रमेश बाबू दोडेकर
वय -७० वर्षे, धंदा -शेती
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.२५ व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२)

५. प्रकाश तुकाराम दोडेकर
वय -५५ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ क व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३)

६. अशोक तुकाराम दोडेकर
वय -४८ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ ड व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४)

७ शेवंती तुकाराम दोडेकर
वय सु.८५ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ अ व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.६)

८. सुवर्णा सुरेश जाधव
वय सु.५६ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.खोंडे/भडगाव,
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ फ व

रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.७)

९. रामकृष्ण पर्शुराम मनवळ
वय सु.४० वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.जांबुर्डे, मनवळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ (ब२) व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.८)

१०. श्रीराम पर्शराम मनवळ
वय सु.४२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.जांबुर्डे, मनवळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ (ब३) व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.९)

१० अनिल पर्शुराम मनवळ
वय सु.३३ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.जांबुर्डे, मनवळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८ (ब४) व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१०)

११ कोमल काशिराम म्हादलेकर
वय सु.३० वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.जांबुर्डे, मन वळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.११)

१२ सुमन यशवंत जाधव
वय सु.४२ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.तळे, जांभुळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.२२ व
रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१२)

१३. वंदना बाळकृष्ण भुवड

वय सु.५४ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.कळंबणी, ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.२१ व रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१३)

१४ रुक्मीणी पांडुरंग मळेकर
वय सु.५८ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.शिरवली, ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.२० व रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१४)

१५ जनाबाई भिकु मनवळ
वय सु.६५ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.जांबुर्डे, मनवळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१५)

१६ जिजाबाई रामचंद्र बंगाल
वय सु.६९ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.सुकिवली,ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१६)

१७ आत्माराम शंकर दोडेकर
वय सु.७० वर्षे, धंदा -शेती
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील वादी व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१७)

१८. सुरेश शांताराम दोडेकर
वय सु.४५ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१ व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१८)

१९. सुजाम शांताराम दोडेकर
वय सु.३५ वर्षे, धंदा -नोकरी

रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.३ व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.१९)

२०. चंद्रभागा काशिराम दोडेकर
वय सु.५८ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१४ व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२०)

२१. सुभाष काशिराम दोडेकर
वय सु.५६ वर्षे, धंदा -रिक्षा चालक
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१५ व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२१)

२२. मंगेश काशिराम दोडेकर
वय सु.४५ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१६ व रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२२)

२३ सुलोचना कृष्णा दोडेकर
वय सु.६२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२३)

२४ सुधाकर कृष्णा दोडेकर
वय सु.३५ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देउळवाडी
ता.खेड, जि.रत्नागि

( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२४)

२५ सुहास कृष्णा दोडेकर
वय सु.२८ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२५)

२६ सुप्रिया संतोष शिगवण
वय सु.३० वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.मुरडे , शिगवणवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२६)

२७ सुजाता निलेश चव्हाण
वय सु.३५ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.ऐनवली , बंगालवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२७)

२८ नारायण सयाजी दोडेकर
वय सु.७५ वर्षे, धंदा -निवृत्त
रा. महाकाली, शिवशंकर नगर, न्यु आगरी पाडा,
सांताकुझ इस्ट, मुंबई नं.५५
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२८)

२९ नंदकुमार सयाजी दोडेकर
वय सु.६१ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.लवेल, शिंदेवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.२९)

३० अनिल सयाजी दोडेकर
वय सु.५० वर्षे, धंदा -नोकरी
रा. त्रिमुर्ती रहिवासी सेवासन, भारद्वाज नगर,
सांताकुक्ष इस्ट, मुंबई नं.५५
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३०)

३१ वासंती कृष्णा बाईत

वय सु.६० वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.तळे, चिंचवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३१)

३२ अशा अशोक कावणकर
वय सु.५० वर्षे, धंदा -गृहिणी
रा.त्रिमुर्ती रहिवासी सेवाशन,
भारद्वाज नगर, सांताकुश इस्ट, मुंबई नं.५५
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३२ )

३३ सुनिल रामचंद दोडेकर
वय सु.४२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी
ता.व्यखेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८(ब३) व
रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३५)

३४ प्रमोद रामचंद्र दोडेकर
वय सु.४२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.महाकाली शिवशंकर नगर,
सिध्दीविनायक रहिवासी सेवासंघ न्यू आगरी पाडा,
सांताकुज, इस्ट मुंबई नं.५५
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३६)

३५ आनंदीबाई दगडु दोडेकर
वय सु.७० वर्षे, शंका -गृहिणी
रा.मु.पो.तळे, देउळवाडी
ता.खेड, जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र.९०/२०१२ मधील प्रतिवादी क्र.१८(ब३) व
रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३७)

३६ प्रदिप दगडु दोडेकर
वय सु.४८ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी

(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३८)

३७ श्रीकांत दगडु दोडेकर
वय सु.४२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३९)

३८ स्वाती सतिश दिवाळे
वय सु.३५ वर्षे धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४०)

३९ रघुनाथ संभाजी दोडेकर
वय सु.७२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.बाबा श्री.प्रदिप दगडु दोडेकर
बा.सु.पो.तळे, देऊळवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४१)

४० यशवंत संभाजी दोडेकर
वय सु.७२ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.तळे, देऊळवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४२)

४१ प्रविण गोपाळ कांदेकर
वय सु.३८ वर्षे, धंदा -नोकरी
रा.मु.पो.शेल्डी, पायरवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४४)

४२ दिपाली दिपक कांगणे
वय सु.४८ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.शिरगाव खोपी, शेवरीचामाळ,
ता.खेड,जि.रत्नागिरी

( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४५)

४३ सविता संदीप खेराडे
वय सु.४६ वर्षे, धंदा -गृहिणी
रा.मु.पो.सोनगाव, माटवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४६)

४४ लक्ष्मी सयाजी दोडेकर
वय-९५ वर्षे, व्यवसाय -काही नाही
रा.मु.पो.तळे, देऊलवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
(रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३३)

४५ विश्वपाल रामचंद्र दोडेकर
वय ५० वर्षे, व्यवसाय निवृत्त
रा.महाकाली शिवशंकर नगर,
सिध्दीविनायक रहिवासी सेवा संघ, न्यू आगरी पाडा,
संताक्रुज, ईस्ट, मुंबई ५५
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.३४)

४६ शशिकला संदीप कांगणे
वय ४० वर्षे, व्यवसाय गृहिणी
रा.हरीगंगा बिल्डींग, रुम क्र.१०३, भाईंदर, पूर्व
केबिन क्रॉस रोड
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४७)

४७ प्रकाश गोपाळ कांदेकर
वय-५० वर्षे, व्यवसाय-नोकरी,
रा.मु.पो.शेल्डी, पायरवाडी,
ता.खेड,जि.रत्नागिरी
( रे.दि.मु.क्र. ९३/२०२५ मधील प्रतिवादी क्र.४३)

अपील मेमोमध्ये क्र.१० दोनदा लिहीला आहे.
श्री.एस.के.खोपकर वकील अपीलार्थी करिता
श्री. एस.जी.चिकणे वकील उत्तरार्थी क्र.१ व २ करिता
उत्तरार्थी क्र.३ ते ४७ करिता वकील नाही

उत्तरार्थींचे नंबर व पत्ते यात टंकलेखनाच्या चुका अपील मेमोमध्ये आहेत. परंतू अपील मेमोमध्ये दुरुस्ती केली नसल्याने जसेच्या तसे टंकलेखन केले आहे.

<u>न्या य नि र्ण य</u>

( दिनांक १०/०३/२०२६ रोजी जाहीर )

१. प्रस्तूतचे अपील दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १०४ नुसार दिनांक ०३.१०.२०२५ रोजी खेड येथील मे. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी रेदिमु नंबर ९३/२०२५ मध्ये वादीचा नि.६ चा अर्ज मंजूर केल्याने व्यथीत होवून मूळ प्रतिवादीने दाखल केले आहे. या कामी अपीलार्थी व उत्तरार्थी यांना त्यांचे मूळ दाव्यातील परिभाषेनुसार उद्बोधीत केले आहे.

वादीची केस थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. दावा मिळकती या मूळ पुरुष बाबाजी याचे एकत्र हिंदु कूटुंबाच्या मालकी व वहिवाटीच्या होत्या. बाबाजी याला धाकटू, दाजी, गोविंद, गणपत व धोंडू असे पाच मुलगे होते. त्यापैकी गणपत विनावारस मयत पावले. तसेच धोंडू यांची मुलगी चंद्राबाई खापरे ही मयत असून विनावारस आहे. धाकटू, दाजी व गोविंद यांचे दावा मिळकतीमध्ये तीन हिस्से आहेत. बाबाजी यांची गावामध्ये घर मिळकत होती. मोठा मुलगा म्हणून धाकटू व त्याचे पश्चात संभाजी धाकटू यांची नावे घर मिळकतीला लागली. कुटुंब वाढत गेल्याने सदर घरामध्ये कर आकारणीकरिता वेगवेगळे नंबर देण्यात आले. असे असले तरी कुटुंब एकत्र राहत होते.

३. बाबू दाजी दोडेकर, रामचंद्र गोविंद दोडेकर, जयराम धाकटू दोडेकर व चंद्राबाई रामचंद्र खापरे यांच्यामध्ये प्रांताधिकारी यांच्याकडे फेरफार नोंद ३९१३ व ३९१४ आरटीएस अपील क्र.१६७३ मध्ये न्यायनिर्णय होवून मंजूर झाल्या. त्यानुसार धाकटू, दाजी व गोविंद यांना प्रत्येकी १/३ हिस्सा ठरविण्यात आला. दिनांक ३१.०३.१९७६ रोजी गावातील पंचांसोबत बैठक घेण्यात आली. त्याला प्रतिष्ठीत व्यक्ती हजर होत्या. धाकटू, दाजी व गोविंद यांचे प्रत्येकी १/३ हिस्से दावा मिळकतीत असल्याबाबत एक रुपयाच्या बॉड पेपरवर दस्त करण्यात आला. दोडेकर कुटुंबाच्या

मिळकती या एकत्र कुटुंबाकरिता कौटुंबिक पैशाने शासनाकडून कूळ वहिवाटीनुसार बाबू दाजी दोडेकर यांचे नावे विकत घेतल्या होत्या. याबाबतचा वाद कौटुंबिक स्तरावर १९८६ साली संपुष्टात आला. परंतू सर्वांची नावे महसूल रेकॉर्डवर दाखल करण्याच्या ऐवजी अनवधानाने धाकटूचा मुलगा जयराम याचे नाव दावा मिळकतीवर नोंदविण्याचे राहून गेले. दरम्यान प्रतिवादी यांनी अन्य इसमांच्या मदतीने दावा मिळकतीमध्ये सागवान, खैर इत्यादी झाडे तोडून विक्री केली. सदर झाडे तोडताना इतर हिस्सेदारांची व वनखात्याची परवानगी घेण्यात आली नाही. दावा मिळकतीचे सरस नीरस मानाने वाटप झाले नसल्याने प्रतिवादींनी झाडे झुडुपे तोडून विकण्याचा अधिकार नाही. सबब वादींनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा व प्रतिवादी क्र.४३ ते ४७ यांचा १/६ हिस्सा घोषीत होवून मिळावा व वाटप होवून मिळणेकरिता दावा दाखल केला. तसेच सामायिक झाडे प्रतिवादींनी तोडून विकल्याने प्रतिवादी क्र.२,५,१७,२१,२२ यांनी रक्कम दोन लाख रुपये मोबदला वादींना दयावा म्हणून मागणी केली आहे. दरम्यान वादींनी तूर्तातूर्त ताकीदीची अर्ज प्रतिवादी क्र.२,५,१७,२१,२२ यांचे विरोधात दावा मिळकतीतील झाडे तोडू नयेत म्हणून केला आहे.

४. प्रतिवादीची केस येणेप्रमाणे ----

प्रतिवादी क्र.५ ने म्हणणे देवून सदर अर्जास विरोध केला. त्याचे नुसार दाजी यांच्या पश्चात त्यांचा ज्येष्ठ मुलगा बाबू याचे नाव दावा मिळकतीपैकी मिळकत क्र. ७,९,१०,११,१५ यांच्या सातबारावर नोंद करण्यात आली. कै.बाबू १९३२ सालापासून दावा मिळकत क्र.१ ते ६ व १३,१४ याचे स्वतंत्र खातेदार होते. त्याबाबत फेरफार क्र.५९३ दिनांक १४.०६.१९५१ रोजी मंजूर आहे. त्यानंतर फेरफार क्र. ५९४ मंजूर करण्यात आला. दावा मिळकती क्र.१६ व १७ या कै.बाबू यांना कूळ कायदयाअन्वये प्राप्त झाल्या आहेत. दावा मिळकतींमध्ये वादी-प्रतिवादी यांची सामायिक कब्जे वहिवाट कधीही नव्हती व नाही. नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०१२ हा वाटपाकरिता प्रलंबीत असून देखील वादी यांनी खोटया कागदपत्रांच्या आधारे दावा दाखल केला आहे. सदर मिळकतीमध्ये बाबू यांचे वारसांची कब्जे वहिवाट आहे. बाबू यांनी दावा मिळकतीत घर बांधले. तसेच कै.संभाजी व त्याचे कुटुंबाला घर बांधून दिले. वादी यांनी खोटा दावा दाखल केला असून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क.५ व त्यांचे

वडील तुकाराम यांनी ३० वर्षापूर्वी झाडांची रोपे लावली व त्याची देखभाल व जोपासना करत आहेत. वादींना दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. सबब दावा व अर्ज निकाली करण्यात यावा.

५. खालील मुद्दे विचारात घेतले. त्यावर उत्तरे येणेप्रमाणे-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे वादीने शाबीत केले काय? | होय |
| २. | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजूने असल्याचे वादीने सिध्द केले काय? | होय |
| ३. | तूर्तातूर्त ताकीदीचा हुकुम नाकारल्यास वादीचे अपरीमित नुकसान होणार असल्याचे त्याने सिध्द केले काय? | होय |
| ४. | संपरीक्षा न्यायालयाच्या निर्णयात फेरबदल करण्याची आवश्यकता आहे काय? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## का र ण मी मां सा

मुद्दा क्र.१ ते ५ -

६. प्रस्तूत प्रकरणामध्ये नि.६ तूर्तातूर्त अर्जाचे कामी उभयपक्षी युक्तीवाद होवून मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर खेड यांनी प्रतिवादी क्र.२,५,१७,२१,२२ यांचे विरुध्द खैर, साग व काजू यांची झाडे तोडण्यास तात्पुरता मनाई हुकुम दिला आहे. मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी सदर निकालपत्रामध्ये दावा मिळकतीमध्ये काजू, साग, आंबा इत्यादी झाडे असल्याबाबत निष्कर्ष काढला. तसेच सकृतदर्शनी मे. कनिष्ठ स्तर न्यायालयानुसार महाराष्ट्र वृक्षतोड नियमन कायदा १९६४ नुसार झाडांचे व जमिनीचे संरक्षण करता येते. सदरचा कायदा हा शहराप्रमाणे इतर विभागांना सुध्दा लागू होतो. त्यानुसार झाडे पाडायची असल्यास परवानगीची आवश्यकता असते. त्याप्रमाणे परवानगीचा हुकुम प्रकरणामध्ये दाखल नाही. तसेच मनाईचा हुकुम देताना किंवा नाकारताना मिळालेला विवेकाधिकारी वापरावा व तो वापरताना न्यायाचा समतोल कोणाचे बाजूने आहे व कोणास अपरिमित नुकसान होईल हे पाहिले पाहिजे असा निष्कर्ष काढला आहे. मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचेनुसार या दाव्यातील विषय व पूर्वीचा

दावा क्र.९०/१९९२ मधील विषय हे वेगवगळे आहेत. पूर्वीच्या दाव्यातील मागणी ही दाजी याचे वारसांविरुध्द मर्यादित आहे. याउलट पूर्वी दाखल केलेला दावा मंजूर झाल्यास त्या दाव्यामध्ये या दाव्यातील वादीला सहाय्य मिळणार नाही. म्हणून तूर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर केला.

७. प्रस्तूत अपीलाचे कामी वादीने दावा क्र. ९३/२०२५ मधील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादींपैकी दाजी यांचे वारस बाबू दाजी दोडेकर, काशीराम दाजी दोडेकर व मयत शंकर दाजी दोडेकर याचा मुलगा आत्माराम यांनी दिनांक २९.०३.१९७६ रोजी बाबू दाजी दोडेकर, संभाजी धाकटू दोडेकर व सयाजी गोविंद दोडेकर असे तीन हिस्से मान्य केले आहेत. सदर दस्त हा वादीचे दाव्यातील कथन परिच्छेद क्र.५ ला पुष्टी देत आहे. जयराम याचेनुसार सदर दस्ताचे वेळी त्याचे नाव दावा मिळकतीस लावण्याचे अनवधानाने राहून गेले होते. जयरामची व त्याच्या वारसाची नावे सातबाराला नसल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीतील झाडे रक्कम रुपये बारा लाख एवढया किंमतीला विकली आहेत. वादींनुसार दावा मिळकतीचे सरस नीरस मानाने वाटप झालेले नसताना सदरची झाडे विकली आहेत. वादी यांची नावे दावा मिळकतीचे सातबारा पत्रकी नाहीत ही वस्तुस्थिती आहे. वादी यांनी दिलेली वंशावळ प्रतिवादी यांनी स्पष्टपणे नाकारली नसून त्या वंशावळीचे आणि प्रतिवादींचे काही हितसंबंध नाहीत असे स्पष्टपणे नाकारलेले नाही. प्रतिवादींनुसार दावा मिळकतींपैकी मिळकती या त्यांचे स्वतंत्र मालकी वहिवाटीच्या तसेच कूळ कायदया अंतर्गत प्राप्त झालेल्या आहेत. त्या कधीही सामायिक वहिवाटीच्या नव्हत्या.

८. दावा मिळकती या प्रतिवादी यांच्या स्वतंत्र मालकी वहिवाटीच्या आहेत किंवा त्या वादी प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत याबाबत दाव्याचे कामी गुणावगुणावर योग्य तो हुकुमनामा होईल. तत्पूर्वी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या वेळी दावा मिळकतीमध्ये जैसे थे परिस्थीती ठेवणे हे न्यायतत्वास अनुसरुन आहे. त्याच आशयाचे कारण मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी दिलेले आहे. तरी परंतू दावा मिळकत क्र.७,९,१०,११,१५ या मिळकती प्रतिवादी क्र.५ चे पूर्वज कै.दाजी व कै.बाबू यांच्या स्वतंत्र मालकी वहिवाटीच्या होत्या व बाबू यांचे पश्चात सदर मिळकती या त्यांची मुले

जनाबाई, तुकाराम, सीताराम, सखाराम, रमेश, जिजाबाई यांचेमध्ये वाटप होवून त्यांची स्वतंत्र वहिवाट असलेबाबत कैफीयतीमध्ये कथन नाही. दावा मिळकत क्र.१ ते ६,१३,१४ या १९३२ पासून कै.बाबू यांचे स्वतंत्र खातेदार म्हणून वहिवाटीस होत्या. तसेच दावा मिळकत क्र.५,८,१२,१३ या धोंडू महादू मोरे, महादू लक्ष्मण मोरे व बाजी कृष्णा मोरे यांच्याकडून कब्जे वहिवाटीने प्राप्त झाल्या व तशी फेरफार नोंद मंजूर होती तसेच दावा मिळकती क्र. १६ व १७ या मिळकती कूळ कायदा कलम ३२ म अन्वये बाबू यांच्या नावे विक्रीने मंजूर झाल्या अशी प्रतिवादींची केस आहे.

९. तरी परंतू दिनांक १९.०३.१९७६ चे करारपत्रामध्ये रामचंद्र गोविंद दोडेकर व वादींचे वडील जयराम धाकटू दोडेकर यांनी रेव्हेन्यूकडे अर्ज करुन हिस्सा शाबीत केला आहे. त्यावर बाबू दोडेकर यांनी प्रांताधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यामध्ये सुनावणी होवून तीन हिस्से मंजूर झाल्याचे मान्य केले आहे. तसेच सदर करारपत्रानुसार दाजी दोडेकर यांचे वारसांनी मिळकतीचे तीन हिस्से त्यांना मान्य असून त्यांचे स्वतंत्र खाते ते पाडून देतील व जमीन मोजून देतील असे लिहून दिलेले आहे. हा कागदोपत्री पुरावा पाहता व प्रतिवादी यांनी सदर दस्ताप्रमाणे वाटप करुन दिले अथवा सदर दस्त हा बोगस स्वरुपाचा आहे अशा प्रकारे कुठलेही कथन केलेले नाही. सबब प्रथमदर्शनी वादी हे बाबाजी दोडेकर यांचा मुलगा धाकटू याचे वारस असून बाबाजी दोडेकर यांचे मिळकतीमध्ये त्यांचा अविभक्त हिस्सा असल्याचे दिसून येत आहे. बाबाजी दोडेकर यांचे वारस कूळ म्हणून कब्जे वहिवाटीनुसार प्रतिवादीची नावे ज्या मिळकतीला लागली त्या मिळकतीमध्ये बाबाजी दोडेकर यांचे वारस म्हणून वादी व प्रतिवादींचा प्रथम दर्शनी हक्क अधिकार आहे. एकाच वारसाचे नावे कूळ कायदयाने खरेदीखत झाले वा नाव लागले तरी इतर वारसांचे हक्क संपुष्टात येत नाहीत. वादीने प्रथमदर्शनी त्यांना केस असल्याचे शाबित केले आहे.

१०. न्यायाचा समतोल वादीचे बाजूने असून दावा मिळकतीमधील झाडांची जैसे थे स्थिती ठेवल्यास प्रतिवादींचे नुकसान नाही. परंतू दावा मिळकतीमधील नगदी उत्पन्न देणारी झाडे प्रतिवादींनी विल्हेवाट लावल्यास वादींचे नुकसान होईल. तसेच विद्वान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी वादीस या दाव्यापूर्वी दाखल केलेल्या

दाव्यामध्ये वादीस योग्य ते हुकुम मिळणार नसल्याचा काढलेला निष्कर्ष ग्राहय धरला आहे. सबब मुद्दा क्र.१ ते ३ यांची उत्तरे वादीचे बाजूने दिली आहेत.

११. विद्वान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी दिनांक ०३.१०.२०२५ रोजी नियमित दिवाणी दावा क्र.९३/२०२५ मध्ये नि.६ वर केलेल्या आदेशामध्ये बदल करण्याची गरज नाही. विद्वान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी योग्य ते आदेश सकृतदर्शनी केसचे अवलोकन करुन दिलेले आहेत. सबब संपरीक्षा न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. म्हणून मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी दिले आहे. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

अपील नामंजूर केले आहे.

Digitally signed by CHANDGUDE PRASANNA SHARAD
Date: 2026.03.11 12:55:02 +0530

दिनांक – १०/०३/२०२६

(प्र.श.चांदगुडे )
जिल्हा न्यायाधीश-१, खेड
ता. खेड, जि.रत्नागिरी.

Certificate

I affirm that the contents of this pdf file Judgment are same word as per original order.
Case No. M.C.A.No.25/2025
Name of Grade I Stenographer : Mrs.V.S.Kulkarni
Court Name : District Court-1, Khed.
Date of Decision : 10.03.2026
Judgment Signed by P.O. on : 11.03.2026
Judgment uploaded on : 11.03.2026